**आरोपी क्र. १ ते ११ करीता उलटतपास – श्री. एस.आर.पोवार वकील.**

६. माझे बारावी पर्यंतचे शिक्षण झाले आहे. मला रवळनाथ दूध संस्थेचा सभासद होणेसाठी अर्ज द्यावा लागतो याची माहिती आहे. मला मी सदर संस्थेचा कोणत्या तारखेला सभासद झालो त्याची तारीख सांगता येणार नाही. मी संस्थेचा सभासद होणेसाठी अर्ज दिला होता. माझ्याकडे त्या अर्जाची प्रत नसून रक्कम भरल्याची अनामत पावती आहे. संस्थेचा सभासद होण्यासाठी कमीत कमी १८० ते २५० दिवस वर्षामध्ये दूध पुरवठा करावा लागतो. माझ्याकडे सन २०१६ साली दूध पुरवठा केल्याचा पुरावा आहे. अनामत रक्कम भरल्याबाबत संस्था पावती देते. मी ती पावती हजर करु शकतो. मी ती पावती पोलिसांना तपासकामी दिलेली नव्हती.

७. सभासद होण्याचा ठराव संस्थेच्या मासिक बैठकीमध्ये घेतला जातो. मी माझ्या सभासद होण्याच्या ठरावाची नक्कल घेतलेली नाही. मला दि.२८/०८/२०१७ रोजी संस्थेची सर्वसाधारण वार्षीक सभा झाल्याची माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला संस्थेने सर्वप्रथम सन २०२३ मध्ये सभासद अनामत पावती दिलेली आहे. संस्थेची सन २०१६ ची निवडणुक झाली होती. मी त्यामध्ये उमेदवार नव्हतो. मला त्यावेळी मतदानाचा अधिकार नव्हता. त्यानंतर सन २०२३ मध्ये निवडणूक झाली आहे. सन २०१२ ते २०१६ या काळात संस्थेचा सभासद नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर काळात संस्थेचा सभासद नसल्यामुळे मला त्याकाळातील अध्यक्ष व सचिव कोण होते याबाबत वैयक्तीक माहिती नाही.

८. मला सन २०१२ ते २०१६ या काळातील संस्थेच्या कामकाजाबाबत वैयक्तीक माहिती नव्हती. मला संस्थेला लोकल ऑडीट करुन घेण्याचा अधिकार असल्याची माहिती आहे. दि.२५/१२/२०१७ च्या सर्वसाधारण सभेत सन २००५–२००६ ते २०१५–२०१६ याकाळातील शासकिय लेखापरिक्षण करण्याबाबत ठराव झाला होता. मी तो ठराव वाचला होता. मी ठराव होण्यापूर्वी संस्थेचे पूर्वीचे लेखापरिक्षण अहवाल पाहिले नव्हते. दि.२५/१२/२०१८ च्या ठरावाप्रमाणे सन २०१८ मध्ये शासकीय लेखापरिक्षण झाले होते. त्याबाबत लेखापरिक्षकानी माझा जबाब घेतलेला नाही.

९. सन २०१६ ते २०२० पर्यंतच्या कालावधीत संस्थेचे दरवर्षी लेखापरिक्षण झालेले

आहे. तो अहवाल मी पाहिलेला नाही. सन २०१६ ते २०२० या कालावधीत संस्थेत गैरव्यवहार झाल्याची तक्रार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींच्या विरोधात लेखापरिक्षकांनी तक्रार करण्याबाबत पाठपुरवठा केलेला आहे. लेखापरिक्षका व्यतिरीक्त आरोपींच्या विरोधात मी अगर इतर सभासदांनी आर्थिक अपहार केल्याबाबत तक्रार दिलेली नाही.

**१०.** मी शासकीय लेखापाल व्ही बी पाटील यांचा अभिप्राय पाहिलेला नाही. पोलिसांना जबाब देण्यापूर्वी आरोप करत असलेल्या अपहाराची कागदपत्रे पाहिली नव्हती. आमच्या गांवात दोन राजकीय गट असून मी एका गटाचा प्रमुख आहे. अशोक शिंदे, सदाशिव माणगांवकर हे दुस–या गटाचे प्रमुख आहेत. आजरोजी दूध संस्था कार्यरत असून त्यामध्ये मी संचालक नाही. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी संस्थेचे संचालक मंडळ माझे विरुध्द गटाचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यांना पदभ्रष्ट करण्यासाठी खोटया प्रकरणात गवले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – २४.११.२०२५. (आर. पी. थोरे)

आजरा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.